मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगार पुरवठा करणेकामी मा. महासभेने दि. २३/०६/२०२१, ठराव क्र. २० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजूरी दिलेली होती. तसेच मा. आयुक्त यांनी दि. १४/११/२०२२ रोजी फेर निविदा ३ वर्षाकरीता मागविण्यास मंजुरी दिलेली होती. या अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-टेंडरव्दारे दि. २०/१२/२०२२ रोजी फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु सदर निविदेस एकाच निविदा काराने प्रतिसाद दिल्याने दि.०२/०१/२०२३ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु सदर निविदेस २ निविदा काराने प्रतिसाद दिल्याने दि.१२/०१/२०२३ रोजी पर्यंत व्दितीय मुदत वाढ देण्यात आली होती. सदर व्दितीय मुदतवाढी अंती ३ निविदा कारांनी निविदा भरलेल्या होत्या.

तांत्रिक लिफाफे पडताळणीमध्ये मे. इगल्स सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विस यांनी अ.क्र. ६ व ११, मे. शाईन मेंटेनन्स प्रा.लि. यांनी अ.क्र. १० व ११ व मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी अ.क्र. १० च्या कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्याने त्यांना दि. १९/०१/२०२३ रोजी पत्र पाठवून दि.२३/०१/२०२३ दुपारी १२.०० वाजे पर्यंत कागदपत्रे जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

मे. शाईन मेंटेनन्स प्रा.लि. यांनी कुठलीही कागदपत्रे जमा न केल्याने ते अपात्र ठरत आहेत. तसेच मे. इगल्स सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विस व मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्याने ते पात्र ठरले असून त्यांच्या दराचा लिफाफा उघडणेस निविदा समितीने शिफारस केली होती. या अनुषंगाने निविदेचे दराचे लिफाफे उघडले असता मे. इगल्स सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विस यांनी प्रती कर्मचारी मासिक दर भरलेले होते. तसेच मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि.यांनी प्रती दिन प्रती कर्मचारी असा दर भरलेला होता व त्यानंतर लेखी पत्रान्वये प्रती दिन प्रती कर्मचारी व मासिक दर याबाबत दि. ०१/०२/२०२३ रोजी कळवलेले आहे. त्यानुसार विभागाने विधी अधिकारी यांना दि. ०७/०२/२०२३ रोजी याबाबत मार्गदर्शन करणेबाबत पत्र लिहले असता त्यांनी शासन निर्णय क्रमांक:सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी पत्रान्वये दिलेले स्पष्टीकरण योग्य असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. तसेच या अभिप्रायमुळे महानगरपालिकेची आर्थिक बचत होणार आहे. निविदाकारांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	मे. इगल्स सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विस	मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि.
१	Providing Spray Worker on Contrct basis as per minimum Wages Act by Contractor / Service Prospective Organization or Medical Health Depat in MBMC Jurisdication Total (Rate as per LABOUR WAGES & OTHER LEGAL DUES COST)	रु. २४,३७९/- प्रती महिना रु. ९३८/- प्रती दिन / प्रती कर्मचारी	रु. २४,३७९/- प्रती महिना रु. ९३८/- प्रती दिन / प्रती कर्मचारी
२	१. **HEALTH & SAFETY KITS** FITNES CERTIFICATE EMPOYEES NAME PALTE HAND GLOVES – ISO MARK SAFETY HELMET – ISO MARK DRESS COAT – ISO MARK FACE MASK – ISO MARK N-९५	रु. ११,३६२/- प्रती महिना रु. ४३७/- प्रती दिन / प्रती कर्मचारी	रु. ८,१३८/- प्रती महिना रु. ३१३/- प्रती दिन / प्रती कर्मचारी

अ.क्र.	कामाचे नाव	मे. इगल्स सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्विस	मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि.
	ATTIRE ALL SAFETY KITS RAIN COAT SAFETY SHOES – ISO MARKS SAFETY GOOGLES – ISO MARK २. **WORKMEN COMPENSATION POLICY FOR ESIC UNCOVERED EMPOYEES**		
TOTAL		रु. १,३७५/- प्रती दिन / प्रती कर्मचारी	**रु. १,२५१/- प्रती दिन / प्रती कर्मचारी**

तरी वरिल प्रमाणे मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी सादर केलेले दर कमी असल्याने त्यांना दि.२०/०२/२०२३ रोजी वाटाघाटीकरीता बोलविण्यात आले होते. पण त्यांनी भरलेले दर हे योग्य असल्याचे सांगत वाटाघाटी करणेस नकार दिलेला आहे व तसे लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे. मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी सादर केलेले दर विभागाने व निविदा समितीने स्विकारणेस शिफारस केलेली आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/ प्र.क्र.७१ (भाग २१) / नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमूद प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. (२८) दि. ०८/०३ /२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता औषध फवारणी कामगार पूरवठा करणेकरिता मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेस मान्यात देणेकामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/ प्र.क्र.७१ (भाग २१) / नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता मे. श्री. स्वामी समर्थ सेक्युरिटी ॲण्ड हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांनी औषध फवारणी कामगार पूरवठा करणेकरिता सादर केलेल्या निविदा दरास व सदर निविदेस ३ वर्षासाठी कार्यादेश देणेस मंजुरी देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागानी विहित पद्धतीने करावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मालमत्ता व्यवस्थापन विभाग

// गोषवारा //

दि.८/०३/२०२३

प्रकरण क्रमांक (२९१) :- भाईंदर (पुर्व) जेसल पार्क नाक्यावरील शिवसेना शाखेजवळील चौकाला स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा) असे नाव देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व वास्तु यांचे नामकरण करण्यासाठी खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भाईंदर (पु.) जेसलपार्क नाक्यावरील शिवसेना शाखे जवळील चौक	स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा)

वरील प्रमाणे रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देण्याबाबत मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील प्रमाणे नावे देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

PC-1/2022-23/SM/SG-23

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०८ ~~फेब्रुवारी~~ मार्च 2023 रोजी दु. ३.०० वाजता.

विषय क्र. (२८७) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

भाईंदर (पुर्व) जेसल पार्क नाक्यावरील शिवसेना शाखेजवळील चौकाला स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा) असे नाव देणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) जेसल पार्क नाक्यावरील शिवसेना शाखेजवळील चौकाला "स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा)" असे नाव देण्याबाबत खालील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठिकाण	प्रस्तावित नाव
1	भाईंदर (पु.) जेसलपार्क नाक्यावरील शिवसेना शाखे जवळील चौक	स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा)

वरील प्रमाणे रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील चौक व रस्ता यांना नावे देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २८० दिनांक ०८/०३/2023

भाईंदर (पुर्व) जेसल पार्क नाक्यावरील शिवसेना शाखेजवळील चौकाला "स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा)" असे नाव देण्याबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर

केल्यानुसार भाईंदर (पुर्व) जेसल पार्क नाक्यावरील शिवसेना शाखेजवळील चौकाला "स्व. दामोदर रामचंद्र तळवणेकर (आप्पा)" असे नाव देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील निर्णयाची नियमानुसार संबंधित विभागाने अंमलबजावणी करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत मालमत्ता व्यवस्थापन विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-1/22-23/SM/SG T- 14

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

// गोषवारा // दि.०८/०३/२०२३

प्रकरण क्रमांक (२९२) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०३ साईबाबानगर, प्रभाग क्र.०४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय शेजारी, प्रभाग क्र.१० गोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र.११ मधील नवघर गावातील मैदानाशेजारी , प्रभाग क्र.१२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र.१३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र.१३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र.१४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र.१४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र.१८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी रु.५ कोटी या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०३ साईबाबानगर, प्रभाग क्र.०४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय शेजारी, प्रभाग क्र.१० गोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र.११ मधील नवघर गावातील मैदानाशेजारी , प्रभाग क्र.१२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र.१३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र.१३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र.१४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र.१४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र.१८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी रु.५ कोटी याप्रमाणे शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १७ जुन २०२२ नुसार प्रकल्प कामाचा एकुण खर्चापैकी ७५% निधी राज्यशासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे. सदर शासन निर्णयामध्ये प्रस्तावित केलेल्या अनु. क्र. ७ मध्ये एकुण १० ठिकाणी ओल्या कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर कामाबाबत प्रस्ताव मा. आयुक्त यांना सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर कामाबाबत चर्चा करणेसाठी सन्मा. आमदार महोदयांशी चर्चा करुन त्याअनुषंगाने फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १० ऑक्टोबर २०२२ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकास योजनेअंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मिती प्रकल्पासाठी १००% पुर्ण हिस्सा राज्यशासनाचा राहणार असुन राज्य शासनाने सदर कामांसाठी एकुण १० ठिकाणी खतनिर्मिती प्रकल्पाकरीता रु.५० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे.

शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १० ऑक्टोबर २०२२ नुसार शासन निर्णयामध्ये नमुद १० ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने मा. प्रशासकिय ठराव क्र.१८८ दि.२९/१२/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठरावानुसार शहरांमध्ये ३ तीन ठिकाणी ६० टन क्षमतेच्या प्रकल्पांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरीत ४० टन क्षमतेच्या प्रकल्पांसाठी १ ठिकाणी प्रकल्प उभारणेकरीता मौजे. चेना सर्व्हे क्र. १०२ पै. येथे जागा उपलब्ध होणार आहे.

संदर्भिय क्र.०२ शासन निर्णयानुसार शासन निर्णयामध्ये नमुद १० ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने संदर्भिय पत्र क्र.०३ प्रशासकिय ठरावाने ६० टनास मान्यता मिळालेली आहे. तरी उर्वरीत ४० टनासाठी रु.२१,७६,५१,३२८/- अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचा तपशिल	प्रकल्पाची क्षमता	होणारा खर्च
१	मौजे. चेना सर्व्हे क्र.१०२ पै.	४० टन	रु.२१,७६,५१,३२८/-
एकुण		४० टन	रु.२१,७६,५१,३२८/-

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यासाठी मान्यता मिळणेस व सदर कामाच्या एकुण रु.२१,७६,५१,३२८/- खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस, उपरोक्त कामाची निविदा मागविण्यास मान्यता मिळण्यासाठी गोषवारा सादर करण्यास मंजुरी मिळणेस तसेच वरील कामांना प्रशासकिय मान्यता मा. जिल्हास्तरीय समिती यांच्या मार्फत देण्यात येणार आहे. तरी वरील काम मा. जिल्हास्तरीय समितीकडे प्रशासकिय मान्यतेसाठी पाठविण्यास शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (घप्रवि)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

गोषवारा प्राप्त दि. 03/03/2023
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा क्रं. ५२/स्थाय/२०२
रजिस्टर अ. क्र ....306.... वर्ष :- 2022-23

निपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

प्रशासकिय ठराव दिनांक ०८ / ०३ **/२०२३ रोजी** दु. ३.०० **वाजता**

विषय क्रमांक - (२९२) मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०३ साईबाबानगर, प्रभाग क्र.०४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय शेजारी, प्रभाग क्र.१० गोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र.११ मधील नवघर गावातील मैदानाशेजारी , प्रभाग क्र.१२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र.१३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र.१३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र.१४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र.१४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र.१८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी रु.५ कोटी या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०३ साईबाबानगर, प्रभाग क्र.०४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय शेजारी, प्रभाग क्र.१० गोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र.११ मधील नवघर गावातील मैदानाशेजारी , प्रभाग क्र.१२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र.१३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र.१३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र.१४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र.१४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र.१८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी रु.५ कोटी याप्रमाणे शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १७ जुन २०२२ नुसार प्रकल्प कामाचा एकुण खर्चापैकी ७५% निधी राज्यशासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे. सदर शासन निर्णयामध्ये प्रस्तावित केलेल्या अनु. क्र. ७ मध्ये एकुण १० ठिकाणी ओल्या कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. सदर कामाबाबत प्रस्ताव मा. आयुक्त यांना सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर कामाबाबत चर्चा करणेसाठी सन्मा. आमदार महोदयांशी चर्चा करुन त्याअनुषंगाने फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १० ऑक्टोबर २०२२ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकास योजनेअंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मिती प्रकल्पासाठी १००% पुर्ण हिस्सा राज्यशासनाचा राहणार असुन राज्य शासनाने सदर कामांसाठी एकुण १० ठिकाणी खतनिर्मिती प्रकल्पाकरीता रु.५० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे.

शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १० ऑक्टोबर २०२२ नुसार शासन निर्णयामध्ये नमुद १० ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने मा. प्रशासकिय ठराव क्र.१८८ दि.२९/१२/२०२२ रोजीच्या प्रशासकिय ठरावानुसार शहरांमध्ये ३ तीन ठिकाणी ६० टन क्षमतेच्या प्रकल्पांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरीत ४० टन क्षमतेच्या प्रकल्पांसाठी १ ठिकाणी प्रकल्प उभारणेकरीता मौजे. चेना सर्व्हे क्र. १०२ पै. येथे जागा उपलब्ध होणार आहे.

संदर्भिय क्र.०२ शासन निर्णयानुसार शासन निर्णयामध्ये नमुद १० ठिकाणी जागा उपलब्ध होत नसल्याने संदर्भिय पत्र क्र.०३ प्रशासकिय ठरावाने ६० टनास मान्यता मिळाली आहे. तरी उर्वरीत ४० टनासाठी रु.२१,७६,५१,३२८/- अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचा तपशिल	प्रकल्पाची क्षमता	होणारा खर्च
१	मौजे. चेना सर्व्हे क्र.१०२ पै.	४० टन	रु.२१,७६,५१,३२८/-
	एकुण	४० टन	रु.२१,७६,५१,३२८/-

सदर कामी रु.२१,७६,५१,३२८/- अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २९७ **दिनांक** ०८/०३/२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०३ साईबाबानगर, प्रभाग क्र.०४ मधील महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय शेजारी, प्रभाग क्र.१० गोडदेव गावातील तलावाशेजारी, प्रभाग क्र.११ मधील नवघर गावातील मैदानाशेजारी , प्रभाग क्र.१२ स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानाशेजारी, प्रभाग क्र.१३ सेव्हन इलेव्हन शाळेशेजारी, प्रभाग क्र.१३ तिवारी कॉलेज शेजारी, प्रभाग क्र.१४ काशिमिरा तलावाशेजारी, प्रभाग क्र.१४ महाजनवाडी परिसरात, प्रभाग क्र.१८ जी.सी.सी. क्लब शेजारी या परिसरामध्ये कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येकी रु.५ कोटी याप्रमाणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन खतनिर्मिती करणे अंतर्गत मौजे. चेना सर्व्हे क्र. १०२ पै. येथे ४० टन क्षमतेचा प्रकल्प उभारणे या कामाच्या एकुण रु.२१,७६,५१,३२८/- अंदाजपत्रकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन खतनिर्मिती करणे कामी शासन निर्णय नगरविकास क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-१६ दि. १० ऑक्टोबर २०२२ मध्ये नमुद जागेत बदल करणेबाबत मा.जिल्हा अधिकारी ठाणे यांना लेखी कळविणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकल्पासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकास योजना अंतर्गत ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मितीसाठी प्रथम टप्यात वरील प्रमाणे एकुण ०२ ठिकाणी खतनिर्मिती प्रकल्पाकरीता येणाऱ्या खर्चाची निविदा प्रकिया करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मिरा भाईंदर महानगरपालिका

परिवहन उपक्रम

// गोषवारा //

दि. ०८/०३/२०२३

प्रकरण क्र. २९३ :- दि.08/03/2023 रोजी "जागतिक महिला दिन" निमित्त सर्व महिलांना मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवास करण्याची परवानगी देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस सेवेसाठी NCC With VGF तत्वावर मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची दि.29/01/2021 रोजी करारनामा करुन नियुक्ती केली आहे. त्यानुसार दि.03/02/2021 पासून बससेवा त्यांच्यामार्फत चालविण्यात येत आहे.

उपरोक्त विषयांन्वये "जागतिक महिला दिना" चे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी लक्षात घेता सर्व महिलांना मनपाच्या परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून दिवसभर मोफत प्रवास मागील 02 वर्षापासून देण्यात येतो. त्यानुसार दि.08/03/2021 रोजी 11,552 व दि.08/03/2022 रोजी 21,463 महिलांनी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून मोफत प्रवास केला होता. सदर मोफत प्रवासापोटी अनुक्रमे रक्कम 1,43,595/- व रक्कम रू.2,73,876/- इतकी प्रतिपुर्ती बस ऑपरेटर मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्टक्चर एल.एल.पी. यांना देण्यात आली होती.

सन 2022-23 चे अर्थसंकल्पात अ-2(15) "जागतिक महिला दिना निमित्त महिलांना मोफत प्रवासासाठी प्रतिपूर्ती खर्च" या लेखाशिर्षकाखाली रू. 5.00 लक्ष तरतूद केलेली आहे.

तरी, प्रतिवर्षीप्रमाणे दि.08/03/2023 रोजी सर्व महिलांना महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून मोफत प्रवास करण्याची परवानगी देणे व महिलांनी मोफत प्रवास केल्याबद्दल झालेल्या तिकीट खर्चाची प्रतिपूर्ती मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रा एलएलपी यांना अदा करणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा भाईंदर महानगरपालिका

परिवहन उपक्रम

प्रशासकीय ठराव दि. ०८ / ०३ /2023

प्रकरण क्र. २०३ :- दि.08/03/2023 रोजी "जागतिक महिला दिन" निमित्त सर्व महिलांना मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवास करण्याची परवानगी देणेबाबत.

ठराव २०२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस सेवेसाठी NCC With VGF तत्वावर मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची दि.29/01/2021 रोजी करारनामा करुन नियुक्ती केली आहे. त्यानुसार दि.03/02/2021 पासून बससेवा त्यांच्यामार्फत चालविण्यात येत आहे.

उपरोक्त विषयांन्वये "जागतिक महिला दिना" चे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी लक्षात घेता सर्व महिलांना मनपाच्या परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून दिवसभर मोफत प्रवास मागील 02 वर्षापासून देण्यात येतो. त्यानुसार दि.08/03/2021 रोजी 11,552 व दि.08/03/2022 रोजी 21,463 महिलांनी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून मोफत प्रवास केला होता. सदर मोफत प्रवासापोटी अनुक्रमे रक्कम 1,43,595/- व रक्कम रू.2,73,876/- इतकी प्रतिपुर्ती बस ऑपरेटर मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्टक्चर एल.एल.पी. यांना देण्यात आली होती.

सन 2022-23 चे अर्थसंकल्पात अ-2(15) "जागतिक महिला दिना निमित्त महिलांना मोफत प्रवासासाठी प्रतिपूर्ती खर्च" या लेखाशिर्षकाखाली रू. 5.00 लक्ष तरतूद केलेली आहे.

तरी, प्रतिवर्षीप्रमाणे दि.08/03/2023 रोजी सर्व महिलांना महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या बसेस मधून मोफत प्रवास करण्याची परवानगी देणे व महिलांनी मोफत प्रवास केल्याबद्दल झालेल्या तिकीट खर्चाची प्रतिपूर्ती मे.महालक्ष्मी कृपा इन्फ्रा एलएलपी यांना अदा करणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

मा. महासभा दि. 01/03/2023

// गोषवारा //

प्रकरण क्रं. २९४ :- दिव्यांग योजनेकरीता तरतुदीचे पुनर्वियोजन करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा अंतर्गत सन 2022-23 या आर्थिक वर्षात "अपंग कल्याण योजना" राबविणेकरीता रु.175.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली होती. माहे डिसेंबर 2022 अखेर सदर तरतुद संपलेली असुन उर्वरीत लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याकरीता अतिरिक्त् तरतुदीची आवश्यकता आहे.

सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील अंध व दिव्याग कल्याण च्या अंदाजपत्रका अंतर्गत "दिव्यांग व मतिमंद यासाठी फिजियोथेरपी सेंटर सुरु करणे (पान क्रं.64)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.200.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना अपंग कल्याण योजनेचा लाभ देण्यासाठी रु.59.93 लक्ष ची आवश्यकता आहे. तरी लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याकरीता "दिव्यांग व मतिमंद यासाठी फिजियोथेरपी सेंटर सुरु करणे" या लेखाशिर्षातुन खर्च करणेकरीता रु.59.93 लक्ष इतक्या तरतुदीचे पुनर्वियोजन करणेकामी प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त
समाजविकास विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे
समाजविकास विभाग
मा. प्रशासकीय सभा दि.०८/ ०३/2023

प्रकरण क्रं.२९४ :- दिव्यांग योजनेकरीता तरतुदीचे पुनर्वियोजन करणेबाबत.

प्रशासकीय ठराव क्रं. २९३ **दिनांक :** ०८/०३/२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा अंतर्गत सन 2022-23 या आर्थिक वर्षात "अपंग कल्याण योजना" राबविणेकरीता रु.175.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली होती. माहे डिसेंबर 2022 अखेर सदर तरतुद संपलेली असुन उर्वरीत लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याकरीता अतिरिक्त् तरतुदीची आवश्यकता आहे.

सन 2022-23 च्या अंदाजपत्रकातील अंध व दिव्याग कल्याण च्या अंदाजपत्रका अंतर्गत "दिव्यांग व मतिमंद यासाठी फिजियोथेरपी सेंटर सुरु करणे (पान क्रं.64)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.200.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना अपंग कल्याण योजनेचा लाभ देण्यासाठी रु.59.93 लक्ष ची आवश्यकता आहे. तरी लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याकरीता "दिव्यांग व मतिमंद यासाठी फिजियोथेरपी सेंटर सुरु करणे" या लेखाशिर्षातुन खर्च करणेकरीता रु.59.93 लक्ष इतक्या रक्कमेचे पुनर्वियोजन करण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस केलेल्या शिफारशीनुसार सदर पुनर्वियोजनास या प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार समाजविकास विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
चिटणीस
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि. ०८/०३/२०२३

// गोषवारा //

२९५

प्रकरण क्र. :- **महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नमुना क्र. 10 नियम 30 (3) पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सन 2022-23 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील 4) वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातील कामाचे देयके प्रदान करावी लागणार आहे. सदर कामी आवश्यक लागणारी तरतुद उपलब्ध करून देणेकामी अति. आयुक्त यांनी मागणी केली होती. त्यानुसार शहर अभियंता यांनी सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील (ब) सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अखर्चित तरतुदीतून रक्कम रु.10.00 कोटीचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

सदरची पुर्नविनियोजन तरतुद सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील (ब) सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अखर्चित तरतुदीतून खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन करणेकामी मा. आयुक्त यांनी दि. / /2023 रोजी मंजुरी दिलेली आहे.

(रुपये लाखात)

	हया लेखाशिर्षातुन					हया लेखाशिर्षात					
क्र.	प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान रुपये	आज तारखे पर्यंत झालेला खर्च	उपलब्ध शिल्लक	प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान रुपये	आज तारखे पर्यंत झालेला खर्च	प्रस्तावीत वाढीची रक्कम	अभिप्राय
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	
1	सार्व. बांधकामे	सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते	10050.00	5520.00	4530.00	आरोग्य व सोयी	4) वॉर्ड साफसफाई	13000.	11656.	10000.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 01, 02, 03 व 04 (जुनी) मधील वॉर्ड साफसफाई कामी कंत्राटी मजुर पुरवठा कामाचे मे 2022 ते डिसेंबर 2022 या कालावधीचे फरकाचे देयके प्रदानासाठी रू. 1000.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे.
	एकुण आवश्यक प्रस्तावित तरतुद									10000	

वरीलप्रमाणे सन 2022-23 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार उक्त लेखाशिर्षाकरीता अपुरी पडणारी तरतुद अखर्चित लेखाशिर्षातून पुर्नविनियोजन करणेस महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नमुना क्र.10 नियम 30 (3) अन्वये मंजुरी मिळणेस शिफारस असे.

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

(रवि पवार)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

मा. प्रशासकीय ठराव दि. ०८ /०३/2023

प्रकरण क्र. :- २८५ **महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नमुना क्र. 10 नियम 30 (3) पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

ठराव क्र. :- २८४

उपरोक्त विषयानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सन 2022-23 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील 4) वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातील कामाचे देयके प्रदान करावी लागणार आहे. सदर कामी आवश्यक लागणारी तरतुद उपलब्ध करून देणेकामी अति. आयुक्त यांनी मागणी केली होती. त्यानुसार शहर अभियंता यांनी सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील (ब) सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अखर्चित तरतुदीतून रक्कम रु.10.00 कोटीचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

सदरची पुर्नविनियोजन तरतुद सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील (ब) सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते या लेखाशिर्षाखाली उपलब्ध अखर्चित तरतुदीतून खालीलप्रमाणे पुर्नविनियोजन करणेकामी मा. आयुक्त यांनी दि. / /2023 रोजी मंजुरी दिलेली आहे.

(रुपये लाखात)

	हया लेखाशिर्षातुन					हया लेखाशिर्षात					अभिप्राय
क्र.	प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान रुपये	आज तारखे पर्यंत झालेला खर्च	उपलब्ध शिल्लक	प्रधान गौण व तपशिलवार शिर्ष	लेखाशिर्ष	मुळ अनुदान रुपये	आज तारखे पर्यंत झालेला खर्च	प्रस्तावीत वाढीची रक्कम	
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	
1	सार्व. बांधकामे	सार्वजनिक बांधकामे (4) नवीन रस्ते/ डी.पी.रोड बांधकाम/ डांबरी व सिमेंट कॉंक्रिट रस्ते	10050.00	5520.00	4530.00	आरोग्य व सोयी	4) वॉर्ड साफसफाई	13000.	11656.	10000.	महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 01, 02, 03 व 04 (जुनी) मधील वॉर्ड साफसफाई कामी कंत्राटी मजुर पुरवठा कामाचे मे 2022 ते डिसेंबर 2022 या कालावधीचे फरकाचे देयके प्रदानासाठी रू. 1000.00 लक्ष वर्ग होण्यास शिफारस आहे.
	एकुण आवश्यक प्रस्तावित तरतुद									10000	

वरीलप्रमाणे सन 2022-23 या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार उक्त लेखाशिर्षाकरीता अपुरी पडणारी तरतुद अखर्चित लेखाशिर्षातून पुर्नविनियोजन करणेस महाराष्ट्र लेखासंहिता 1971 नमुना क्र. 10 नियम 30 (3) अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवलकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका